18 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येकाने अवश्य मतदान करावे : डॉ. सैनी

कोलापूर, ता. १७ : मतदान क्रियेत सुटसुटीतपणा आणण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने अत्यंत चांगले प्रयत्न केले आहेत. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये, याची दक्षता घेतली आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने २१ फेब्रुवारीला मतदान अवश्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी आज येथे केले.

जिल्हा प्रशासन आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग तसेच यू ट्यूबद्वारे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील २८० महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना डॉ. सैनी यांनी संबोधित केले.



सर्व विद्यार्थ्यांनी कोणत्याही कारणाने मतदान प्रक्रियेपासून दूर राहू नये. मतदान करावेच, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्याबरोबर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनीही विद्यार्थी, शिक्षकांना संबोधित केले.

डॉ. सैनी म्हणाले, ''महाराष्ट्रात जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेस प्रारंभ झालेला आहे. जिल्ह्यात २१ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. मतदान ओळखपत्रधारकांनी जरूर मतदान करावे. आपले नाव मतदान यादीत नसल्यास टू व्होटर ॲप्लिकेशनद्वारे स्मार्ट फोनच्या मदतीने डाऊनलोड करा अथवा इंटरनेटच्या सुविधेचा वापर करून sec.maharashtra.gov.in या वेबसाइटवरील मतदार यादीत आपले नाव शोधू शकता. यामुळे आपले नाव कोणत्या मतदान केंद्राशी जोडलेले आहे, हेही कळेल. सर्वांनी मतदान करावयाचे आहे. तसेच आपण आपल्या कुटुंबीयांना, मित्रांना मतदान करण्याचे आवाहन करावे. मतदान केंद्रांवर मतदारांच्या जरी लांब रांगा लागलेल्या असल्या तरी आपण त्या ठिकाणी जाऊन मतदान करावे.''

ते म्हणाले, ''निवडणूक आयोगाने या वेळी एका नव्या संकल्पनेस प्रारंभ केल्यामुळे मतदानाच्या ठिकाणी लावलेल्या फ्लेक्स बोर्डच्या माध्यमातून उमेदवारांची नावे, त्यांची शैक्षणिक अर्हता, गुन्हेगारी पार्श्वभूमी यांची संपूर्ण मालमत्ता यांचे विवरण मतदारांना उपलब्ध होणार आहे.''

## नवमतदारांनो, गांभीर्याने घ्या

**नव्याने मतदानाचा अधिकार प्राप्त युवकांनी निवडणुकांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. निवडणुकांमध्ये मतदानाची कमी होणारी टक्केवारी ही राजकीय पक्ष आणि सरकार यांच्यासाठी चिंताजनक आहे. तरी नवमतदारांनी गांभीर्याने मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.**



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2017
पुढारी

# लोकशाही सुदृढ होण्यासाठी मतदान करा : जिल्हाधिकारी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मतदान प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने चांगले प्रयत्न केले आहेत. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यात आली आहे. प्रत्येकाने मतदान करून लोकशाही सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा प्रशासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१७) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग आणि यूट्यूबद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २८० महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी डॉ. सैनी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सैनी म्हणाले, जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेस प्रारंभ झाला असून दि. २१ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. मतदान ओळखपत्र नसणाऱ्यांना मतदान स्लिप देण्यात येणार आहे. तसेच फोटो असलेले ओळखपत्र दाखवून मतदान करता येणार आहे. नाव मतदान यादीत नसल्यास ट्रू व्होटर ॲप्लिकेशनद्वारे स्मार्टफोनच्या मदतीने डाऊनलोड करता येणार आहे. इंटरनेटच्या सुविधेचा वापर करुन sec.maharashtra.gov.in या वेबसाईटवरील मतदारयादीत नाव शोधता येईल.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, निवडणुकांमध्ये मतदानाची कमी होणारी टक्केवारी ही राजकीय पक्ष आणि सरकार यांच्यासाठी चिंताजनक आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी कार्यक्षम, प्रामाणिक आणि चारित्र्यवान उमेदवाराची निवड करणे आवश्यक आहे. नव्याने मतदानाचा अधिकार प्राप्त युवकांनी निवडणुकांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. नवमतदारांनी गांभीर्याने मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.

निवडणूक आयोगाने यावेळी एका नव्या संकल्पनेस प्रारंभ केल्यामुळे मतदानाच्या ठिकाणी लावलेल्या फ्लेक्सबोर्डच्या माध्यमातून उमेदवारांची नावे, त्यांची शैक्षणिक अर्हता, गुन्हेगारी पार्श्वभूमी यांची संपूर्ण मालमत्ता यांचे विवरण मतदारांना उपलब्ध होणार आहे, असेही जिल्हाधिकारी डॉ. सैनी यांनी सांगितले.

18 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्यादेवींचे कर्तृत्व धार्मिक कार्यापुरते मर्यादित नव्हते : सोनवणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कर्तृत्व धार्मिक कार्यापुरतेच मर्यादित नव्हते. मल्हारराव होळकरांची तेजस्वी बुद्धिमान व पराक्रमी सून असलेल्या अहिल्यादेवींच्या भालाफेकीतील कौशल्याचे टिपू सुलतानानेही वर्णन केले आहे. मध्ययुगीन भारतातील एक युद्धकुशल, स्वतंत्रतावादी, कायदेतज्ज्ञ, उद्योगांचे महत्त्व समजणारी अशी असामान्य स्त्री होती, असे प्रतिपादन होळकरांच्या इतिहासाचे अभ्यासक संजय सोनवणी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक विचार' व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.

सोनवणी म्हणाले, मध्ययुगीन कालखंडात परंपरेची बंधने झुगारून व प्रसंगी सनातन्यांचा रोष अदिल्यादेवींनी ओढावून घेतला. वंचित समाजात जन्माला येऊनही, वंचिततेवर मात करून वंचित समूहांसाठी कार्य केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांवर आजही अधिकृत चरित्रग्रंथ उपलब्ध नाही, याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविक सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी केले. प्रा. अविनाश भाले यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. निलिशा देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. चांगदेव बंडगर, रावसाहेब पुजारी, दशरथ पारेकर, अमोल पांढरे, विद्यार्थी उपस्थित होते. किशोर खिलारे, शरद पाटील, श्रीधर साळोखे यांनी संयोजन केले.

18 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**संजय सोनवणी : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान; धार्मिक कार्यापुरतेच कर्तृत्व मर्यादित नव्हते**

# अहिल्यादेवी स्वतंत्रतावादी महिला

कोल्हापूर : अहिल्यादेवी होळकर म्हटले की एक देशभक्त, हातामध्ये शिवपिंड घेतलेली धर्मपरायण महिलाच समोर येते. परंतु, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कर्तृत्व धार्मिक कार्यापुरतेच मर्यादित नव्हते. मल्हारराव होळकरांची अत्यंत तेजस्वी बुद्धिमान, पराक्रमी सून असलेल्या अहिल्यादेवींच्या भालाफेकीतील कौशल्याचे टिपू सुलतानानेही वर्णन केलेले आढळते. मध्ययुगीन भारतातली एक युद्धकुशल, स्वतंत्रतावादी, कायदेतज्ज्ञ, रसिक, उद्योगांचे महत्त्व समजणाऱ्या ,त्या महिला होत्या, असे होळकरांच्या इतिहासाचे अभ्यासक डॉ. संजय सोनवणी यांनी शुक्रवारी येथे केले.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व अभ्यास केंद्रातर्फे व्याख्यानामध्ये इतिहास अभ्यास संजय सोनवणी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. नंदा पारेकर उपस्थित होत्या.

शिवाजी विद्यापीठाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक विचार' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. इतिहास अभ्यासक सोनवणी म्हणाले, मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांचे जीवन रूढी-परंपरांच्या चौकटीमध्ये बांधले गेलेले होते. स्त्रियांचे नखदेखील कुणाला दिसू नये इतके त्यांना 'पडदानशीन' केले गेलेले होते, पण त्याच काळात परंपरेची बंधने झुगारून देणारी आणि प्रसंगी सनातन्यांचा रोष ओढावून घेणाऱ्या अहिल्यादेवी या आपल्याला दिसतात. या कार्यक्रमास प्रा. कोळेकर, डॉ. अवनिश पाटील, नीलांबरी जगताप, चांगदेव बंडगर, रावसाहेब पुजारी, दशरथ पारेकर, अमोल पांढरे, श्री. खाडे, आदी उपस्थित होते. अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अविनाश भाले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला डॉ. नीलिशा देसाई यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

## अधिकृत चरित्रग्रंथ उपलब्ध नाही

वंचित समाजात जन्माला येऊनही, वंचिततेवर मात करून वंचित समूहांसाठी कार्य केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांवर आजही अधिकृत चरित्रग्रंथ उपलब्ध नाही, याची खंत इतिहास अभ्यासक डॉ. सोनवणी यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, आपल्या राज्यात विधवांना दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार देणे, बालविवाहास प्रतिबंध करणे, स्त्रियांचे स्वतंत्र सैनिक प्रशिक्षण केंद्र काढणे व स्त्रियांची बटालियन स्थापन करणे किंवा महिला विणकरांना प्रोत्साहन देणे आणि एका अथनि वस्त्रोद्योग व्यवसायाचा पाया घालणे यासारखी त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेली कामे ही त्यांची दूरदृष्टी आणि कर्तृत्वाची साक्ष देतात.

18 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करावे

## महेश काकडे




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधार' या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना परीक्षा नियंत्रक महेश काकडे.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** आजचे विद्यार्थी शिक्षणाबद्दल खूप जागरूक आहेत. त्यांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे ही आवश्यक गरज बनली आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील शिक्षणाशास्त्र अधिविभाग आणि परीक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित केलेल्या 'उच्च शिक्षणातील परीक्षा सुधार' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

परीक्षा नियंत्रक महेश काकडे म्हणाले, संशोधन केंद्रीत, संस्कार केंद्रीत समाज घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. त्यासाठी शिक्षण पूरक व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. चांगले शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा प्रस्तुत करत असतात. उच्च शिक्षणातील परीक्षा पद्धतींमध्ये संपूर्ण राज्यात एकसारखेपणा आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न होणे आवश्यक आहे. परीक्षा प्रणालीमध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी सर्व घटकांनी सकारात्मकता दर्शवली पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, उच्च शिक्षणातील परीक्षा सुधारांवर विचार करण्याची ही योग्य वेळ आहे. विकसित देशांमध्ये प्रकल्प, समस्यांवर आधारित शिक्षण तसेच व्यावहारिक शिक्षणावर आधारित परीक्षा पद्धतीचा आवलंब केला जात आहे. यासाठी विद्यार्थी ग्रंथालये, विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेत आहेत. तसेच, आवश्यकतेप्रमाणे उद्योग केंद्रांचीही मदत घेतात. कागद विरहित परीक्षा पद्धती, ऑनलाईन परीक्षा पद्धतीचा वापर करण्यासंदर्भात विचार होणे आवश्यक आहे.

शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख आणि या परिसंवादाचे संयोजक डॉ. पी. एस. पाटणकर यांनी पाहुण्यांचे स्वागत तर डॉ. सी. पी. सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी. पी. मरजे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. जी. एस. पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एम. एम. उपलाने तसेच, डॉ. एम. एस. पद्मिनी, डॉ. के. बी. पाटील, डॉ. पी. एस. कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2017
Times of India

# 'We must reform our education system'

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** "Online examination is the need of the hour. Therefore, it is the right time to start paperless examination," Shivaji University, Kolhapur (SUK) registrar, Vilas Nandavadekar, on Thursday said.

Nandavedekar was speaking at the inauguration ceremony of a workshop organised by the department of Humanities at SUK campus. The workshop was based on examination reforms.

He added, "It is the right time to reform our higher education system. In developed countries, we see that the students performance is based on the projects and practicals. We need to amend the same kind of changes in our education system as well."

Controller of examinations (COE), SUK, Mahesh Kakade, said, " The present generation of students are aware of their surroundings. Therefore, their faculty members must also be updated to match their awareness level."

He added, "Our education system must be research oriented and culture centric. A good teacher is an asset for a supportive education system. A good teacher spreads positive energy among students. At present, there must be uniformity in our system of education. To make sure that the latest technology is implemented properly, all elements involved should show their support."

> It is the right time to reform our higher education system. In developed countries, we see that the students performance is based on the projects and practicals. We need to amend the same kind of changes in our education system as well
>
> **V Nandavadekar** | REGISTRAR, SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

18 FEB 2017

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# A stunning end to Shivotsav 2017

Pics: Soumini Shinde




Glimpses from Shivotsav 2017

Monika Jasuja

The city's Shivaji University Kolhapur (SUK) played host to the 32nd national-level inter-university festival — *Shivotsav 2017* this week. The festival, that commenced last week and culminated on February 14, was a true carnival of colour and celebration. The event was hosted after 9 years and this year it just got bigger and better. Kolhapur Times brings you glimpses...

## OVER 1500 STUDENTS ATTENDED THE FESTIVAL

The university witnessed an overwhelming response this time as compared to the last time it hosted the festival.

Around 1500 students from 79 universities across the country filled the lush green university campus during the festival. These students were accomodated on the university campus. Mahesh Prajapat, a student from Makhanlal University of Bhopal, shared, "This university has such a beautiful campus, including a lake. I loved the warmth and hospitality that the campus and its host members exuded."

The festival saw a larger number of female participants too, this time. Dr Rajaram Gurav, director of the students welfare committee at SUK, said, "Nowadays, there's been an increasing number of girls coming forward and taking part in all the national festival, which wasn't the case last time. It's a welcome change."

## FROM PLAYS TO DEBATES; A PLETHORA OF OFFERINGS

The festival comprised a plethora of competitions which were conducted at various parts of the university and hosted by different departments. There were competitions including classical vocals, group singing, cultural rallies, quizzes, elocution, debates, one-act plays, on-spot painting and more. Each category had three winning spots. The overall winners were the University of Mumbai, followed by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University at second place. Guru Nanak Dev University, Amritsar came third, while Lovely Professional University, Jalandhar took the fourth place.

CONTINUED ON PAGE 3

18 FEB 2017

**Times of India**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Pics: Soumini Shinde

# Colourful glimpses from Shivotsav 2017







**WHAT SHIVOTSAV IS ALL ABOUT**

This is an all-India national youth festival that's conducted by the Association of Indian Universities and with aid from the Ministry of Youth Affairs and Sports. The festival is conducted at different centres and universities across the country.





सपर्क कक्ष
द्यापीठ, कोल्हापूर

# lourful mpses from votsav 2017





CONTINUED FROM PAGE 1

## RALLY ON CASHLESS TRANSACTIONS, A KEY HIGHLIGHT

SUK conducted a rally competition on the theme, 'Cashless Transactions: Empower to Indian Economy', where students campaigned to encourage cashless transactions as the way forward. Alok Jatratkar, Public Relations Officer of SUK, shared, "This rally was primarily held because we wanted to create awareness using such an occasion at a national level. In fact, we have incorporated this throughout SUK with the help of our students. Now, hostel students can make payments through online transactions.

Participants regaled in the rally as students dressed in costumes, holding up banners and posters, walked the university's lanes. Krishna University from Machilipatnam, Andhra Pradesh bagged the first prize for the best arrangements, quotes and posters.

## ONE-ACT PLAYS GALORE

One of the most interesting events at the festival was the one-act plays competition, that saw the staging of 15 plays. Plays on different themes, like water scarcity and its consequences, prostitution, stress and nervous breakdowns, etc, seemed to stand out. The most well-received one thought was the play based on the life of Charlie Chaplin, staged by the Chandigarh University, Mohali; it bagged the first prize.

Shantanu Patil, a volunteer student from SUK, said, "The play was extremely overwhelming. It's impact was such that it had everyone in tears. The second position was shared by Assam State University and University of Kerala, that performed a play on Shakuntala and Dushyant and a Sanskrit play *Mrucchakatikam* respectively.

Each play was given 30 minutes of presentation time. These were staged to a packed auditorium.

## WHAT WORKED, WHAT DIDN'T

SUK had formed 26 committees to ensure smooth management of the four-day festival. Each committee was assigned a head and specific tasks. Volunteer students were deployed at various corners of the campus to guide visiting students with directions, venues and provide other assistance, if any.

Despite such planning, the university did not expect such an overwhelming turnout of students. Dr Rajaram said, "This time, almost all the universities we invited turned up for the festival, something we did not quite anticipate. We were particularly worried about how we'd accommodate so many visitors. But in future, we would take into consideration such cases too, as well as seek help from nearby universities for accommodation."





जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2017
पुढारी

# विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमाला सोमवारपासून

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० व २१ रोजी विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. पी.ए. गवळी हे 'छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासकीय धोरण व पेशवेकालीन सरंजामशाही' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.पद्मजा पाटील असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक डॉ. निलांबरी जगताप यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2017
तरुण भारत

# विद्यापीठात मंगळवारी डॉ. गवळी यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेतंर्गत २१ रोजी व्याख्यानाचे आयोजन केले आहे. 'छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासकीय धोरण व पेशवेकालीन सरंजामशाही' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. पी. ए. गवळी मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 FEB 2017
तरुण भारत

# विद्यापीठात सिंहावलोकन कार्यक्रमाचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागामार्फत सिहांवलोकन कार्यक्रमाला प्रारंभ झाला. या कार्यक्रमादरम्यान विविध स्पर्धा होतील. बँक ऑफ महाराष्ट्राचे विभागीय व्यवस्थापक अनंत घाटे उद्घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कुलसचिव डॉ.व्ही. डी.नांदवडेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एमबीए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी सिंहावलोकन या कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे विभागप्रमुख, डॉ. ए.एम. गुरव उपस्थित होते. एमबीए अधिविभागाच्या श्रीमती. एस. एस. कांबळे यांनी आभार मानले.

18 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# 'मेकॅनिकल इंजिनीअरिंग'साठी नवा कोर्स सुरू

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

इंजिनीअरींग अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नोकरीची संधी निर्माण करुन देण्यासाठी येथील विद्या प्रबोधिनीच्यावतीने नवीन कोर्सेस सुरू केले आहेत.

इंडस्ट्रीच्या विद्यार्थ्यांकडून असलेल्या अपेक्षा आणि नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या स्कील यांचा यात समावेश केला आहे. कोर्समध्ये मुलाखतीची तयारी कशी करावी, सॉफ्ट स्कील, बायोडाटा तयार करणे, लीडरशीप, प्रभावी संवादकौशल्य यांचा समावेश आहे. याशिवाय एनडीटीएनडीटीचे चार पद्धतीचे कोर्सेस उपलब्ध होत आहेत. कोर्स पूर्ण झाल्यावर लेवल वन व टूचे प्रमाणपत्र मिळणार आहे. त्याचा उपयोग नोकरी मिळवण्यासाठी होणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शाहूपुरी येथील विद्याप्रबोधिनी क्लासेसमध्ये समंपर्क साधावा असे, आवाहन नितिन कामत यांनी केले आहे.